**ग्रामरोजगार सेवकांना मानधन**
**अदा करण्याच्या संदर्भात**
**मार्गदर्शक सूचना व कार्यपद्धती**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्र. मग्रारो २०११/ प्रक्र. ४०/ रोहयो- १० अ**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : ३० ऑगस्ट, २०११**

**परिपत्रक -**

ग्रामरोजगार सेवकांच्या नियुक्ती संदर्भात व त्यांना वेळेवर मानधन अदा करण्याबाबत वेळोवेळी शासन स्तरावरुन सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच या संदर्भात दि. ३०.६.२०११ च्या अ.शा. पत्राद्वारे देण्यात आलेल्या १० कलमी कृती कार्यक्रमातही याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि अद्यापही बऱ्याच जिल्ह्यात ग्राम रोजगार सेवकांना वेळेवर मानधन मिळत नसल्याचे आढळून आले आहे. याचे एक कारण म्हणजे मानधन अदा करण्याची कार्यपध्दती बऱ्याच जिल्ह्यात माहित नसल्याचे दिसते.

यासाठी सुस्पष्ट कार्यपध्दती सर्व संबधीतांच्या माहितीसाठी खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

१) ग्रामरोजगार सेवकाने मस्टर सादर करताना त्यातील मजूरीच्या रकमेप्रमाणे २.२५% रक्कमेची गणना करुन गटविकास अधिकारी यांचेकडे दिल्यानंतर गटविकास अधिकारी यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

अ) मस्टर वरील नोंदिप्रमाणे मजूरीच्या रकमेची गणना करणे.
ब) ग्रामरोजगार सेवकांना अदा करावयाच्या एकूण मजूरीच्या रकमेपैकी २.२५% रकमेची गणना करणे.

२) तद्नंतर ग्रामरोजगार सेवकांना अदा करावयाच्या रकमेचे धनादेश / धनाकर्ष (DD) संबधीत ग्रामपंचायतींच्या नावे काढण्याची कार्यवाही गटविकास अधिकारी यांनी करावी. संबधीत ग्रामरोजगार सेवकांना थेट गटविकास अधिकाऱ्यांमार्फत मानधन अदा करु नये कारण त्यांची नियुक्ती ग्रामपंचायती मार्फत करण्यात येते.

३) ग्रामपंचायतीला करावयाचे सदर प्रदान हे मजूरीच्या रकमेचे नसून ६% प्रशासकीय निधीपैकी आहे. त्यामुळे गटविकास अधिकाऱ्यांनी या रकमेची वेगळी व्हाऊचर बनवावी. म्हणजेच सर्व खर्च खालील ३ प्रकारे विभागला जाईल.

अ) अकुशल मजूरीची प्रदाने - मस्टर प्रमाणे
ब) कुशल व अर्धकुशल खर्चाची प्रदाने - व्हाऊचर
क) प्रशासकीय खर्च (ग्रामरोजगार सेवकांची प्रदाने इ.) - व्हाऊचर

ROTA-I H 1853 (200-9-2011).

४) याचप्रमाणे यंत्रणांमार्फत केल्या जाणाऱ्या कामांशी संबंधीत ग्रामरोजगार सेवकांनाही मजूरीच्या रकमेच्या २.२५% दराने मानधन देण्याबाबत दिनांक २७/५/२०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे आदेश देण्यात आले आहे.

५) यंत्रणांमार्फत केलेल्या कामांच्या संदर्भात ग्रामरोजगार सेवकांना एकूण मजूरीच्या २.२५% दराने द्यावयाचे मानधन तहसिलदार यांनी ग्रामपंचायतीला अदा करावे.

६) वरील सूचनांनुसार ग्रामरोजगार सेवकांना खालील प्रमाणे मानधन मिळेल.

अ) ग्रामपंचायती द्वारे केल्या जाणाऱ्या कामाच्या मजूरी रकमेच्या २.२५% दराने मानधन (गटविकास अधिकारी यांचे कडून ग्रामपंचायती मार्फत)

ब) यंत्रणांमार्फत केल्या जाणाऱ्या कामाच्या मजूरी रकमेच्या २.२५% दराने मानधन (तहसिलदार यांचे कडून ग्रामपंचायती मार्फत)

७) वरील प्रमाणे ग्रामरोजगार सेवकांना अदा करावयाचे मानधन हे ६% प्रशासकीय निधीमधूनच अदा करावयाचे असून त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या पुर्वपरवानगीची आवश्यकता नाही. तहसिलदार व गटविकास अधिकारी यांनी त्यांच्याकडे जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडून प्राप्त होणाऱ्या निधी मधून या रकमेची प्रदाने करावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

वि. गिरीराज

**(व्ही. गिरीराज)**
**प्रधान सचिव**

**प्रति,**
**सर्व विभागीय आयुक्त,**
**सर्व जिल्हाधिकारी,**
**सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी**

........